# प्रसिद्धीपत्रक

केंद्रीय नौकानयन मंत्रालयाच्या आदेशानुसार जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट, शेवा, नवी मुंबई  येथे दिनांक 16 मार्च ते 31 मार्च पर्यंत स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत “स्वच्छ भारत विशेष पंधरवडा” चे आयोजन जेएनपीटी अध्यक्ष श्री अनिल डिग्गीकर, भाप्रसे हयांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेले आहे॰

सदर अभियानाअंतर्गत आजतागायत प्रशासन भवन व हॉस्पिटल येथील जुन्या फर्निचर व कागदपत्रांची वि‍ल्हेवाट लावण्यात आली आहे. भांडार व सामग्री विभागातून १४ टनच्या ई-कच-याची विल्हेवाट लावण्यात आली आहे. जेट्टीवरील साफसफाईचे काम जोरात सुरु आहे. दिनांक २१ मार्च रोजी कर्मचारी व कंत्राटी कामगार यांना सफाई बाबतचे प्रशि‍क्षण देण्यात आले. जेऐनपीटी वसाहतीतील इमारतींना एकाच प्रकारच्या रंग देण्याचे काम सुरु आहे. सदर मोहीमे अतर्गत बंदर विभागात व जेऐनपीटी वसाहतीमध्ये नालेसफाईचे काम सुरु आहे. जेऐनपीटी बंदर परीसर व वसाहतीत ठिकठिकाणी स्वच्छेतेच्या माहितीसदर्भात फलक लावण्यात आले आहेत.

